# जिल्हा परिषद, सांगली

## वित्त विभाग

**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली-मिरज रोड, पुष्पराज चौक, सांगली ता.-मिरज, जि.-सांगली**

---

**फोन नं.०२३३-२३७२८६५** Email ID - cafozpsangli@yahoo.in

---


## फेर ई लिलाव संक्षिप्त सुचना क्र. १ /२०१७-१८

सांगली जिल्हा परिषद, सांगलीकडील विविध विभागांकडील ड वर्गीकृत म्हणजेच नाशन करावयाच्या रद्दी कागदांची ई लिलाव पद्धतीने विक्री करावयाची असून सदर ई लिलाव करिता नोंदणीकृत कंत्राटदारांना निमंत्रीत करण्यात येत आहे. याबाबत सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | सुचना |
|---|---|---|
| १ | ई लिलाव प्रसिध्दीचे संकेतस्थळ | www.eauction.gov.in |
| २ | ई लिलाव प्रसिध्द दिनांक | दि.१६/१०/२०१७ ते दि. २५/१०/२०१७ |
| ३ | ई लिलावाचे अनुषंगाने तांत्रिक लिफाफा सादर करणे | दि.१६/१०/२०१७ ते दि.२५/१०/२०१७ ३.०० वाजेपर्यंत |
| ४ | ई लिलाव कंत्राटदारांची तांत्रिक छाननी | दि.२६/१०/२०१७ ते दि.२७/१०/२०१७ |
| ५ | ई लिलावास पात्र ठरणाऱ्या लिलावधारकास ऑनलाईन बोली लावणेचा दिनांक व वेळ | दि. २८/१०/२०१७ वेळ- दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत |
| ६ | ई लिलाव फार्म फी | रुपये ३०००/- |
| ७ | ई लिलाव बयाणा रक्कम | रुपये १००००/- |
| ८ | ई लिलाव संबंधी शंका निरसनासाठी संपर्क दुरध्वनी क्रमांक | ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००२, ०८८२६-२४६५९३, support - eproc@nic.in |
| ९ | वेस्ट पेपरची ई लिलावाव्दारे विक्री करावयाची किमान हातची प्रति क्विंटल (१०० किलो) किंमत | रुपये १०००/- प्रति क्विंटल (१००किलो) |
| १० | लिलाव करावयाच्या रद्दी कागदाचे अंदाजे वजन | १०० टन म्हणजेच १००० क्विंटल पुठयासहीत ( यामध्ये मध्ये कमी/ जास्त फरक होण्याची शक्यता आहे.) |
| ११ | लिलाव धारकास बोली वाढविण्याची किंमत | प्रति क्विंटल रुपये २५ च्या पट्टीत |
| १२ | लिलावाची अंतिम किंमत | हातची किंमत रुपये १०००/- प्रति क्विंटल + रुपये २५ प्रति क्विंटलच्या पट्टीत वाढविलेली उच्चतम बोली |

ऑनलाईन स्वरुपात लिलाव पार पडणेकरिता किमान ३ कंत्राटदार तांत्रिक छाणणीतून पात्र असणे आवश्यक आहे. ३ पेक्षा कमी कंत्राटदार पात्र झालेस सदर लिलाव प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात येईल अथवा खालील स्वाक्षरी करणारे अधिकारी यांचे निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-- स्वाक्षरी--
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
जिल्हा परिषद सांगली

-- स्वाक्षरी--
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सांगली

ई लिलाव प्रक्रियेकरिता कंत्राटदारांनी खाली नमुद अटी व शर्ती क्र १ ते ९मध्ये नमुद कागदपत्रे मुळ / साक्षांकित प्रती स्कॅन करुन पी.डी.एफ. स्वरुपात ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक राहील. सदर कागदपत्रे त्रोटक अथवा अपुर्ण स्वरुपात सादर केल्यास व तांत्रिक छाननी मध्ये अपात्र ठरविल्यास कंत्राटदाराची कोणत्याही स्वरुपाची तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही अगर ऑनलाईन Bidding मध्ये सहभागी करुन घेतले जाणार नाही. याची सर्व कंत्राटदारांनी नोंद घ्यावी.

तांत्रिक लिफाफा क्र. १ अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

१) ई लिलाव फार्म फी रुपये ३०००/- चा धनाकर्ष मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचे नावे
२) ई लिलाव बयाणा रक्कम रुपये १००००/- चा धनाकर्ष (परतावा) मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद सांगली यांचे नावे.
३) पॅन कार्ड.
४) सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील आयकर परतावा सादर केलेबाबत (Acknowledgment).
५) वस्तू व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र.
६) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील सनदी लेखापाल यांचे कडील वार्षिक ताळेबंद प्रमाणपत्र / लेखापरिक्षण अहवाल
७) लिलावधारकांचे वैध कालावधीतील दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र **रद्दी खरेदी व पुर्नवापर बाबत**
८) जोडपत्र अ मध्ये नमुद मजकूर १०० रुपयेचे स्टॅम्प पेपर वर स्वसांक्षाकीत करुन अपलोड करणे.
९) शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन रद्दी कागद खरेदी केलेबाबत पुरवठा आदेश /अनुभव प्रमाणपत्र.

- वरील सर्व कागदपत्रे मुळ अथवा स्वसांक्षाकिंत PDF स्वरुपात स्कॅन करुन अपलोड करावयाचे आहेत.
- दिनांक.२७/१०/२०१७ रोजी तांत्रीक छाननी मध्ये पात्र ठरणाऱ्या कंत्राटदारास दि.२८/१०/२०१७ रोजी होणाऱ्या Online Bidding मध्ये सहभागी करुन घेतली जाईल. या करिता किमान ३ कंत्राटदार तांत्रीक छाननी मध्ये पात्र झालेस Online Bidding राबविण्यात येईल.
- तीनपेक्षा कमी कंत्राटदार पात्र झाल्यास सदर लिलाव प्रक्रियेस मुदतवाढ देणेत येईल अथवा खालील स्वाक्षरी करणारे अधिकारी यांचे निर्णयानुसार कार्यवाही करणेत येईल.
- कराराच्या अटी व शर्ती व रद्दी उचलण्याची कार्यपध्दती :
  १. Online Bidding द्वारे दर अंतिम झाले नंतर Higher I (उच्चत्तम बोली लावणारे कंत्राटदार) एक आठवडयाचे आत जोडपत्र क मध्ये विहीत केलेप्रमाणे २०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन घेणेचा आहे. तदनंतरच पुरवठा आदेश निर्गमित करणेत येईल.
  २. कार्यारंभ आदेश तात्काळ प्राप्त करुन घेऊन जिल्हा परिषद, सांगली व १० पंचायत समितीच्या आवारातील Waste paper ड वर्गीकृत कार्यालयीन कागदाचा खाली नमुद तरतुदीच्या अधीन राहून शासकीय कामाचे दिवशी व कार्यालयीन वेळेत उचल करणेचा आहे.
  ३. Waste paper ड वर्गीकृत शासकीय कागदाची उचल करणे करिता जे वाहन कंत्राटदार वापरात आणतील त्या वाहनाची विना सामानाचे वजन सांगली जिल्हा परिषद मुख्यालय व पंचायत समिती मिरज, तासगांव , विटा, पलुस, कडेगांव, इस्लामपूर शिराळा,कवठेमहंकाळ, जत व आटपाडी येथील कार्यालयाकडून अनुक्रमे मुख्य कार्यकारी अधिकारी व गटविकास अधिकारी यांनी निश्चित केलेल्या टन वजन काटयावर प्राधिकृत अधिकाऱ्यांचे समक्ष करणेत येईल.
  ४. कंत्राटदारांनी वाहनामध्ये प्रादेशिक विभागाचे मंजूर क्षमतेनुसार कागदाची उचल करणेची आहे.
  ५. Waste paper ड वर्गीकृत कार्यालयीन कागदाची उचल झालेनंतर संबंधित वाहनाची सामानासह जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर निश्चिती केलेल्या समिती समक्ष समिती ठरवेल त्या टन वजन काटयावर वजन करणेत येईल.
  ६. त्यानंतर सदर वाहन जिल्हा परिषद सांगली व जिल्हयातील १० पंचायत समितीच्या आवारात प्राधिकृत अधिकाऱ्यांनी निर्देशित केल्या प्रमाणे लिलावाची रक्कम भरणा केलेनंतरच वाहन सोडले जाईल याबाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
  ७. कार्यारंभ आदेशानुसार निश्चित करणेत आलेली प्रति टन दराप्रमाणेची एकूण वजनाअनुरुप अंतिम होणारी रक्कम कंत्राटदाराने जिल्हा परिषद स्वीय निधीत व पंचायत समिती सेस खात्यात त्याच दिवशी भरणा करणेचा आहे. भरणा करावयाच्या रक्कमेबाबतचे (Mode of Deposit) कार्यपध्दती स्वतंत्रपणे निर्गमित करणेत येईल.

८. लिलावाची रक्कम जमा झालेची खात्री झालेनंतर Waste paper ड वर्गीकृत कार्यालयीन कागदासह जिल्हा परिषदेच्या व पंचायत समितीच्या आवारात उभे करण्यात आलेले वाहन आवारा बाहेर सोडण्यात येईल.

९. कंत्राटदाराकडून मालाची विहित कालावधीमध्ये उचल न केल्यास मालाच्या किंमतीवर ०.५ % प्रती आठवडयाप्रमाणे दंड कंत्राटदाराकडून आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) उचल कालावधीमध्ये उचल न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर

अशा किंमतीच्या १० % दंड

ब) उचल कालावधीमध्ये उचल न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर

अशा किंमतीच्या ५ % दंड

१०. मंजूर केलेले दर हे ई-लिलाव मंजूरीच्या आदेशाच्या तारखेपासून एक महिना कालावधीसाठी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

११. पेढीने ई-लिलाव सादर केलेली असल्यास,त्यातील भागीदाराने ती स्वाक्षरीत केली पाहिजे किंवा कोणताही भागीदार अनुपस्थित असल्यास तसे करण्यास प्राधिकृत करणारा मुख्तीयारनामा (Power of Attorney) धारण करणा-या व्यक्तीने त्यांच्या वतीने ती स्वाक्षरीत केली पाहिजे. भागीदार / मुख्तीयारपत्र (Power of Attorney) वगैरेची सत्यप्रत ई-लिलावसोबत जोडली पाहिजे.

१२. कंत्राटदाराच्या कोणत्याही अटी शर्ती या कार्यालयावर बंधनकारक राहणार नाहीत. ई लिलाव प्रक्रिया रद्द करणे अथवा नाकारणे याबाबतचे संपूर्ण अधिकार खालील स्वाक्षरी करणारे अधिकाऱ्यांकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

१३. यशस्वी कंत्राटदारास उच्चतम दराने अंदाजे १०० टन रद्दी खरेदीच्या कार्यकंत्राट खरेदीच्या ३ टक्के रक्कमेचा सुरक्षा अनामत म्हणून धनाकर्ष देणेचा आहे. सदर सुरक्षा अनामत जिल्हा व पंचायत समिती स्तरावरील सर्व रद्दी कागदांची उचल झालेनंतर एक महिना कालावधी नंतर कंत्राटदारांनी मागणी केल्यास परत करण्यात येईल.

१४. कंत्राटदाराने उचल केलेल्या लिलाव रद्दी कागदाचे लगदा करुन पुर्नवापर केला जाईल याची दक्षता घेणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे.

१५. कंत्राटदाराने उपरोक्त शर्तीचा भंग केलेस संबंधितास काळया यादीत टाकणेत येईल त्याचप्रामाणे शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केले प्रकरणी भारतीय दंड संहिता १८६० कलम ३५३ व शासकीय मालमत्तेस नुकसान पोहचवले बाबत भारतीय दंड संहिता १८६० कलम नुसार फौजदारी स्वरुपाची कारवाई करणेत येईल.

१६. सदर बाबतीत न्यायालयीन कार्यक्षेत्र सांगली जिल्हा न्यायालय सांगली राहील.

| | |
|---|---|
| -- स्वाक्षरी-- | -- स्वाक्षरी-- |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| जिल्हा परिषद सांगली | जिल्हा परिषद सांगली |

# जोडपत्र अ

(निविदाकाराने स्वत:चे लेटरहेडवर भरुन द्यावयाचे आहे)

मी________________________________प्रोप्रा/मालक असुन आपल्या विभागाकडील _________________________ खरेदीविषयक ई-लिलावभरु इच्छितो. तसेच मला खालील नमुद क्र. 1 ते 8 मधील अटी व शर्ती बिनशर्त मान्य आहेत. जर मी खालील अटींपैकी एकजरी अटींचा भंग केल्यास होणाऱ्या कारवाईस मी व्यक्तीशः जबाबदार राहीन याबाबत मला तक्रार करणेचा कोणताही हक्क अथवा अधिकार राहणार नाही याची मला पुर्णत: जाणीव आहे.

1. लिलावप्रक्रियेमधुन कोणत्याही टप्प्यावर माघार घेणार नाही. अगर घेतल्यास लिलावमागविणारे प्राधिकारी ठरवतील त्या कार्यवाहीस मी कोणत्याही प्रकारचा आक्षेप नोंदवणार नाही.
2. लिलावस्विकृती नंतर जर ि ललावप्रक्रियेतून मी माघार घेतल्यास व लिलावमागविणाऱ्या प्राधिकारणास जादा दराची लिलावस्विकारावी लागल्यास जादा दरातील फरकाची वसूली कोणत्याही कायदेशीर मार्गाने करणेचा हक्क हा लिलावविषयक समितीस राहील. याबाबत माझी कसलीही हरकत असणार नाही.
3. पुरवठा आदेश प्राप्त झालेनंतर जर मी पुरवठा करण्यास असमर्थ ठरलो तर सदर नुकसानाबाबत मी व्यक्तिशः जबाबदार राहीन. याबाबत लिलावमागविणाऱ्या प्राधिकारणास जादा दराची लिलावस्विकारावी लागल्यास जादा दरातील फरकाची वसूली कोणत्याही कायदेशीर मार्गाने करणेचा हक्क हा लिलावविषयक समितीस राहील. तसेच माझ्यावर लिलावमागविणाऱ्या प्राधिकारणाने कारवाई केल्यास त्यास माझी काहीही हरकत असणार नाही.
4. लिलावप्रारुपामधील अटी व शर्तीचे तसेच, शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या आदेशांचे पालन करणेस मी बांधील राहीन.
5. निविदेद्वारे मागविणेत आलेले साहित्य विहित वेळेत, विहित तपशिलानुसार व विहित दरानुसार पुरवठा करणेची मी हमी घेत आहे. तसे न झाल्यास होणाऱ्या कारवाईस मी व्यक्तीशः जबाबदार राहीन त्याबाबत माझ ाी काहीही हरकत असणार नाही.
6. लिलावप्रक्रियेदरम्यान न्यायिक पुर्नविलोकनाचा प्रसंग उद्‌भवल्यास त्याचे न्यायालयीन कार्यक्षेत्र सांगली जिल्हा न्यायालय हे राहील याची मला पुर्ण जाणीव आहे.
7. लिलावप्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर शासन दरकरार उपलब्ध झाल्यास लिलावप्राधिकारण जो निर्णय घेईल तो मला मान्य असेल याबाबत कोणत्याही नुकसान भरपाई मागणीस मी पात्र राहणार नाही.
8. लिलावप्राधिकारणाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करण्यास मी बांधील राहीन.

वर नमुद अटी व शर्ती 1 ते 8 या मी वाचल्या आहेत व त्यामध्ये नमुद बाबीची मला पुर्ण जाणीव आहे. तरी मी माझी लिलावयासोबत सादर करीत आहे.

स्वाक्षरी

शिक्का

## जिल्हा परिषद, सांगली.

### जि.प. व पं.स. कडील "ड" वर्गीकृत रददी कागदांचा ई निविदा बाबत तांत्रिक तुलनात्मक तक्ता

| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | लिलाव धारकाचे नाव | लिलाव फी रु.३०००/- ऑनलाईन पद्धतीने भरलेबाबतची पावती. | लिलाव बयाणा रक्कम रु.१००००/- धनाकर्ष स्कॅन करुन सोबत जोडणेत यावा. | रददी कागद खरेदीबाबत महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत वेध कालावधीतील परवाना. | पॅन कार्ड | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील आयकर परतावा सादर केलेबाबत (Acknowledgment). | सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील विक्रीकर भरणा केलेबाबत निपटारा प्रमाणपत्र/ ३१ मार्च २०१७ अखेरचे चलन | वस्तू व सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र. | सन २०१६-२०१७ या अर्थिक वर्षातील संस्थेचे सनदी लेखापाल यांचे लेखा परिक्षण अहवाल | निविदा काराचे वेध कालावधीतील दुकान व आस्थापना नोंदणी प्रामणपत्र | जोडपत्र अ मध्ये नमुद मजकूर १०० रुपयेचे स्टॅम्प पेपर वर स्वसांक्षाकीत करुन अपलोड करणे. | किमान लिलावरक्कमे इतका शासकीय/निमशासकीय कार्यालयाकडुन कागद लिलाव पध्दतीने खरेदी केलेबाबत पुरवठा आदेश/अनुभव प्रमाणपत्र. | शेरा |
| १ | पृथ्वी ट्रेडींग कंपनी, कोल्हापूर | धनाकर्ष पृष्ठ क्र. ३ | धनाकर्ष पृष्ठ क्र. ३ | नाही | आहे पृष्ठ क्र. १९ | २०१५-१६ चा आहे पृष्ठ क्र. १३ | नाही | आहे पृष्ठ क्र. १० | स्वतःचे स्वाक्षरीचे २०१५-१६ चे पृष्ठ क्र.१६,१७ | आहे पृष्ठ क्र. १९ | आहे पृष्ठ क्र. ५ ते ९ | आहे परंतु रक्कम नमुद नाही. प्ष्ट क्र. २१ ते २५ | अपात्र स्तंभ क्र. ४,६,७,९,१२ अपुर्ण |
| २ | रोहीत ट्रेडींग कंपनी, कोल्हापूर. | धनाकर्ष पृष्ठ क्र. ३ | धनाकर्ष पृष्ठ क्र. ३ | नाही | आहे पृष्ठ क्र. १९ | २०१५-१६ चा आहे पृष्ठ क्र. १० | नाही | आहे पृष्ठ क्र. २७ ते २९ | २०१५-१६ चे पृष्ठ क्र.११ ते १४ | आहे पृष्ठ क्र. २२ | आहे पृष्ठ क्र. ५ ते ९ | आहे परंतु रक्कम नमुद नाही. प्ष्ट क्र. १५ ते २२१,२४,२५ | अपात्र स्तंभ क्र. ४,६,७,९,१२ अपुर्ण |
| ३ | सुरज ट्रेडींग कंपनी. सांगली | धनाकर्ष पृष्ठ क्र. ३ | धनाकर्ष पृष्ठ क्र. ३ | नाही | आहे पृष्ठ क्र. १९ | २०१६-१७ चा आहे पृष्ठ क्र. ९ | नाही | आहे पृष्ठ क्र. ६ | आहे पष्ठ क्र.७, ८ | आहे पृष्ठ क्र. १३ | आहे पृष्ठ क्र. ५ | आहे परंतु रक्कम नमुद नाही. पृष्ठ क्र.२१ते २५ | अपात्र स्तंभ क्र. ४,७,१२ अपुर्ण |
| ४ | विजय ट्रेडर्स, कोल्हापूर | धनाकर्ष पृष्ठ क्र. ३ | धनाकर्ष पृष्ठ क्र. ३ | नाही | आहे पृष्ठ क्र. १९ | २०१६-१७ चा आहे पृष्ठ क्र. १४ | नाही | आहे पृष्ठ क्र. ७ | २०१५-१६चा असून सर्टीफाय नाही. पृष्ठ क्र. १०ते १२ | आहे पृष्ठ क्र. ५ | आहे पृष्ठ क्र. १५ | आहे परंतु रक्कम नमुद नाही. पृष्ठ क्र. १७ ते २१ | अपात्र स्तंभ क्र. ४,७,९,१२ अपुर्ण |

Accounts Officer
Zilla Parishad, Sangli.

Dy. Chief Accounts & Finance Officer
Zilla Parishad, Sangli.
२३/१०/१७.

Chief Accounts & Finance Officer
Zilla Parishad, Sangli.

Chief Executive Officer
Sangli Zilla Parishad, Sangli.